

## पिंपरी चिंचवड मध्ये होणार पाच विधानसभा मतदारसंघ - अजित पवार

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 19/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 135 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध उपक्रमांचे उद्घाटन

## सुनियोजित आणि विकसीत शहरासाठी पुढील ५० वर्षाचे नियोजन व्हावे - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड हे वाढते शहर असून त्याचा विकास सुनियोजितरित्या होण्यासाठी शहराचा उत्तम आराखडा करा आणि पुढच्या पिढीचा विचार करून आगामी ५० वर्षाचे नियोजन व्हावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शहराचे नियोजन करत असतांना जनतेला विश्वासात घेणे गरजेचे असून त्यादृष्टीने लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या मागणीनुसार चऱ्होलीची नगर रचना योजना रद्द करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



हायवेपर्यंतचा सिंबायोसिस कॉलेजमागील १८ मीटर डी.पी. रस्ता विकसित करणे, प्रभाग क्र. १६ विकासनगर येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करून विकसित करणे, गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौक पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट स्केपिंग पद्धतीने विकसित करण्याच्या कामाचा भुमिपूजन तसेच पिंपरी चिंचवड शहरातील दिव्यांग नागरिकांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवनचक्राचे मॅपिंग करण्याच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी येथे उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचे समुहशिल्प व संतसृष्टीचे लोकार्पण, संतपीठ येथील प्रेक्षागृह व कलादालन लोकार्पण यासह विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, श्रीकांत भारतीय, महेश लांडगे, शंकर जगताप, माजी आमदार अश्विनी जगताप, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, जिल्हाधिकारी संत साहित्याचे अभ्यासक ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आदी उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, ज्ञानेश्वर माऊलींनी सोप्या शब्दात भागवत धर्माचे तत्वज्ञान आणि आपला वैश्विक विचार आपल्यापर्यंत पोहोचविला. त्यामुळेच माऊलीच्या पालखीत लाखो वारकरी सहभागी होतात. संत नामदेव महाराजांनी ही परंपरा आपल्यापर्यंत अभंगाच्या माध्यमातून पोहोचविताना भागवत धर्मातील हा विचार पंजाबपर्यंत पोहोचविला. शिखांचा धर्मग्रंथ 'गुरु ग्रंथसाहिब'मध्ये संत नामदेव महाराजांचे विचार समाविष्ट आहेत. ज्यांनी भागवत धर्माला उंची दिली अशा दोन संतश्रेष्ठाच्या भेटीचे शिल्प महानगरपालिकेने उभारले आहे. वारकरी संप्रदायात प्रत्येक जण एकमेकांना माऊली समजतो, ईश्वराचे रूप समजतो, हाच भाव या शिल्पात आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. जगाला साद घालणारा आणि दिशा देणारा असा आपला वैश्विक विचार आहे. एका पिढीने दुसऱ्याला दिल्याने तो टिकून आहे. जोपर्यंत वारी आहे तोपर्यंत विचार आहे, आणि सूर्य-चंद्र असेपर्यंत वारी आहे. या विचाराच्या प्रसारासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सुंदर संतपीठ तयार केले. सीबीएसई अभ्यासक्रमासोबत हा विचार पोहोचविण्याचे कार्य संतपीठाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे संतपिठाच्या विस्तारासाठी आराखडे, नियोजन केल्यास त्याच्यापाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे राहील.

इंद्रायणी नदी निर्मळ करण्यासाठी नदीमध्ये जाणारे १०० टक्के पाणी प्रक्रिया केलेले असेल यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या माध्यमातून इंद्रायणीचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी अमृत योजनेंतर्गत दोन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू होत आहे. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे फडणवीस म्हणाले. महापालिकेचे विकास प्रकल्प नागरिकांसाठी उपयुक्त असून खेळाडू तयार करणारी पिढी घडावी यासाठी महापालिकेने उभारलेली क्लायबिंग वॉल उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पोलीस आयुक्तालयाने दोन चांगल्या प्रणाली सुरू केल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात आधाराची गरज असते, कोणीतरी पाठीशी उभे आहे असे त्यांना वाटायला हवे. अनेकदा ज्येष्ठांना आपत्कालीन परिस्थितीत मदतीची आवश्यकता असते. माणुसकी हा खरा धर्म म्हणून पोलीस काम करतात. त्यादृष्टीने पोलीस आयुक्तालयाने तयार केलेले 'ज्येष्ठानुबंध' हे ॲप ज्येष्ठ नागरिकांना उपयुक्त ठरेल. पुणे, पिंपरी चिंचवड आदी ठिकाणी वाहतुकीच्या नियमनासाठी 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' सुरू करण्यात येत असून त्यात एआयचा समावेश असलेल्या प्रणाली आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पोलीस दल सज्ज होत असून नागरिकांसाठी चांगली यंत्रणा उभी रहात आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आमदार लांडगे म्हणाले, राज्य शासनाने सहकार्य केल्याने पिंपरी चिंचवड परिसरात पोलीस आयुक्तालयाची आणि महानगरपालिकेची विकासकामे वेगाने होत आहेत. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी या परिसराच्या विकासाला विशेष गती दिल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रभाग क्र. १६ मध्ये मुकाई चौक कृष्णा हॉटेल ते लोढा स्किमपर्यंत एक्सप्रेस हायवे लगतचा १२ मीटर डी.पी. सर्विस रस्ता विकसित करणे (भाग १ व भाग २), बापदेव मंदिर येथील किवळे गावातील मुख्य रस्ता ते एक्सप्रेस

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने संत मदर टेरेसा उड्डाणपूलावरून चिंचवड बाजूकडे उतरण्यास व चढण्यास बांधण्यात आलेल्या लूप, रॅम्प, पवना नदीवर थेरगाव प्र. क्र. ५० मध्ये प्रसुनधाम शेजारी १८ मीटर डी.पी. रस्त्यावरील उभारण्यात आलेल्या थेरगाव-चिंचवड पूल, अमृत योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या चिखली (१२ एमएलडी) व पिंपळे निलख (१५ एमएलडी) क्षमतेच्या मैलाशुद्धीकरण प्रकल्प, पिंपळे सौदागर येथे गिर्यारोहणासाठी उभारण्यात आलेल्या क्लायबिंग वॉल, प्रभाग क्र. ४ दिघी येथे आरक्षण क्र. २/१२२ येथे बांधलेल्या शाळा इमारत, प्रभाग क्र. ३ चऱ्होली येथील चोविसावाडी येथील अग्निशमन केंद्र इमारत, भोसरी येथील प्रभाग क्र. ७, आरक्षण क्र. ४३० येथील प्राथमिक शाळा इमारत, थेरगाव व भोसरी रुग्णालयाचे मध्यवर्ती निर्जंतुकीकरण विभाग, प्रभागाचे लोकार्पण करण्यासह क्र. ५ मधील सखुबाई गबाजी गवळी उद्यान येथील बहुमजली वाहनतळ इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

# मोदी सरकारने विकसित भारताचा पाया रचला - रविंद्र चव्हाण

## पश्चिम महाराष्ट्र विभागीय आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष, मंडल अध्यक्ष, पदाधिका-यांशी साधला संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : नरेंद्र मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात 'विकसित भारता'चा पाया रचला गेला असून, महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या मनात 'कमळ' रुजले पाहिजे, असे प्रतिपादन भाजप प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले. आज काळेवाडी, पिंपरी-चिंचवड येथे झालेल्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय आढावा बैठकीत ते बोलत होते.




आमदार रवींद्र चव्हाण यांनी बैठकीत पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या महत्त्वपूर्ण बैठकीला प्रदेश महासचिव आमदार विक्रांत पाटील, प्रदेश महामंत्री माधवी नाईक, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, संघटन मंत्री रवी अनासपुरे, संघटन मंत्री मकरंद देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पश्चिम महाराष्ट्र विभाग संवादक योगेश बाचल यांच्यासह पश्चिम महाराष्ट्र विभागातील भाजपचे सर्व जिल्हाध्यक्ष, मंडल अध्यक्ष आणि इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ते म्हणाले की, 'कमळ' हे केवळ भाजपचे चिन्ह नसून, आपल्या राष्ट्रीय विचारसरणीचा अविभाज्य भाग आहे. मोदी सरकारच्या ११ वर्षांचा कार्यकाळ हा खऱ्या अर्थाने विकसित भारताच्या पायाभरणीचा काळ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'संकल्प से सिद्धी तक' या सूत्रावर आधारित गेल्या ११ वर्षांत केलेल्या अभूतपूर्व विकासकामांचा आढावा प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यावर सर्वांनी भर दिला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

चव्हाण यांनी सांगितले की, आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी महाराष्ट्रात भाजपला अधिक मजबूत करता येईल आणि 'विकसित भारता'च्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान देता येईल.

'निर्धार भाजपा परिवार संघटनाचा, महाराष्ट्राच्या विकासाचा' असा नाराही त्यांनी दिला.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र विभागातील भाजप परिवाराच्या सर्व नवनियुक्त जिल्हाध्यक्षांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. या प्रसंगी सर्व जिल्हाध्यक्षांशी संवाद साधत त्यांना राष्ट्रनिर्माणाच्या कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# चऱ्होलीची टीपी स्कीम रद्द

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार प्रशासक शेखर सिंह यांची कार्यवाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार बुधवारी पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या प्रशासनाने मौजे चऱ्होली येथील T P scheme बाबतच्या प्रस्तावाला मान्यता दिली. महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP Schem अखेर रद्द झाली असून, ग्रामस्थ तसेच भूमिपुत्रांना यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने चिखली आणि मौजे चऱ्होली येथे नवीन नगर योजना प्रस्तावित ठेवली. या TP scheme संदर्भात मोठा रोष पाहायला मिळाला. ग्रामस्थ भूमिपुत्र यांनी "करो या मरो" असा पवित्र घेत टीपी स्कीम



बाबत विरोध दर्शवला होता. भूमिपुत्रांचा विरोध लक्षात घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी या संदर्भात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत बैठक घेतली होती. यामध्ये आमदारांनी ग्रामस्थ तसेच भूमिपुत्रांच्या भावना, या परिसरात आतापर्यंत झालेले भूसंपादन त्यामुळे भूमिपुत्रांवर झालेला अन्याय सविस्तरपणे मांडला होता. मात्र, दरम्यानच्या काळात चिखली येथील टीपी स्कीम रद्द करण्यात आली. तर दुसरीकडे मौजे चऱ्होली येथील टीपी स्कीमचा निर्णय स्थगिती असा ठेवलेला होता. या विरोधात ग्रामस्थ भूमिपुत्र यांचा प्रचंड रोष होता. महापालिका विविध विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पण करण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आमदार महेश लांडगे यांनी हा मुद्दा छेडला. भूमिपुत्रांवर भूसंपादनाच्या बाबत झालेला अन्याय त्यांनी स्पष्टपणे मांडला. याची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यासपीठावरूनच प्रशासनाला ही टीपी स्कीम रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच, भूमिपुत्रांना डावलून कोणताही विकास आम्हाला करायचा नाही, असे देखील स्पष्टपणे सांगितले.

# लोकसभेत शिवसेना पेक्षा युवक संघटनेचे काम जास्त - इमरान शेख

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : लोकसभा व विधानसभा निवडणुकीत युवक शहराध्यक्ष या नात्याने मी प्रामाणिकपणे काम केल आहे. तसेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडीतील शिवसेना पक्षाच्या कामापेक्षा युवक संघटनेने जास्त काम केलं असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे युवक शहराध्यक्ष इमरान शेख यांनी दिली.



पक्षाने दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडत आहे. राष्ट्रवादीचे दोन राष्ट्रवादी झाल्यानंतर अनेकांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची साथ सोडली परंतु मी साथ सोडली नाही. मी राष्ट्रवादीचा युवक शहराध्यक्ष म्हणून नेहमीच पक्ष बांधणीचं काम केलं, पक्ष वाढविण्याचे काम केलं,, युवकांना जोडण्याचं काम केलं ,या पिंपरी चिंचवड शहरात सर्वांनीच राष्ट्रवादीची साथ सोडली परंतु मी आपल्या राष्ट्रवादी सोबत राहून राष्ट्रवादी पक्ष वाढविण्याचे काम सुरूच ठेवलं असं आपल्या भाषणात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे युवक शहराध्यक्ष इमरान शेख यांनी सांगितलं

पिंपरी चिंचवड शहरात मंगळवारी ताथवडे परिसरातील सिल्वर बँकेट हॉल येथे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. यावेळी युवक शहराध्यक्ष इमरान शेख बोलत होते.

मी नेहमी पवार साहेबांच्या विचारा सोबत राहिलो, मी अनेक युवकांचे कार्यकर्ते मेळावे घेतले व दाखवून दिले की पिंपरी चिंचवड शहरात शरद पवार यांच्या विचारांना मानणारा वर्ग मोठा आहे व हा वर्ग आमच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष सोबत आहे.

भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या माजी नगरसेविका प्रियंका ताई बारसे, रहाटणी परिसरातील माजी नगरसेवक मच्छिंद्र तापकीर यांना पक्षात घेण्याचं काम आम्ही केलं. पक्षाचा युवक अध्यक्ष म्हणून आम्ही आमचं काम सुरूच ठेवलं ,मेळावे घेतले पक्षाचे कार्यक्रम राबविले ,पक्ष वाढवत राहिलो.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी कोणताही नगरसेवक नसताना, तसेच विरोधी पक्षात महेश लांडगे व अजित गव्हाणे असताना खासदार अमोल कोल्हे यांच्या निवडणुकीच काम आम्ही प्रामाणिकपणे केलं फक्त आणि फक्त युवक व महिला पदाधिकाऱ्यांच्या जोरावर आम्ही सर्वांनी खासदार अमोल कोल्हे यांचा प्रचार केला. दिवस रात्र आम्ही रक्ताचं पाणी केलं आणि अमोल कोल्हे यांच्या प्रचारात महाविकास आघाडीतील शिवसेनेपेक्षा जास्त काम आमच्या युवक संघटनेने केलं याचा मला अभिमान वाटतो असं इमरान शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले. विधानसभा निवडणुकीत हि जागोजागी आम्ही आपले उमेदवार राहुल कलाटे यांच्यासाठी बूथ निर्मिती करून युवक संघटनेन काम केलं राहुल कलाटे यांच्या प्रचार प्रामाणिकपणे केला.पक्षाने दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडली आहे असे इमरान शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# मनपा आयुक्त शेखर सिंह यांची बदली लवकरच

## अजित दादांनी दिले संकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांचा कार्यकाळ हा लांबला आहे साधारण आयुक्तांचा कार्यकाळ हा तीन वर्षाचा असतो व शेखर सिंह यांना तीन वर्ष होऊन गेले आहेत त्यांची लवकरच बदली होणार आहे असे संकेत आपल्या भाषणात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.




पिंपरी चिंचवड शहर कार्यकर्ता मेळावा 17 जून रोजी भोसरी येथील कै.अंकुशराव लांडगे सभागृहात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी अजित पवार बोलत होते.पिंपरी चिंचवड शहरात रेड झोन चा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने सर्वे करण्यात आला आहे. मोजणी केली,परंतु त्याचा अधिकृत नकाशा महापालिका वतीने प्रसिद्ध करण्यात आला नाही, टी. डी. आर. चा पण प्रश्न आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनेक प्रश्न आहेत हे सर्व प्रश्न शहरातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी नोट करून द्यावेत सध्याच्या आयुक्तांना बराच काळ झाला आहे . तीन वर्षात बदली होत असते जसे पुण्यामध्ये नवीन आयुक्त आले तसेच नवीन आयुक्त आता लवकरच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत येणार आहेत असे आपल्या भाषणात अजित पवार यांनी सांगितले.महानगरपालिकेचे सध्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी 2022 मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार सांभाळला त्यानंतर आता 2025 मध्ये त्यांना तीन वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यामुळे त्यांचा आयुक्त पदाचा कार्यकाळ आता संपुष्टात येणारा असून नवीन आयुक्तांची नियुक्ती लवकरच होईल तसेच अजित पवार यांनी सांगितले की नवीन आलेल्या आयुक्तांना आपण पिंपरी चिंचवड शहरातील टी.पी.डी.पी. व शहरातील विकास आराखड्या बाबत बोलू व त्यातून मार्ग काढू.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 19/06/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी चिंचवड मध्ये होणार पाच विधानसभा मतदारसंघ - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत आहे. या वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे पिंपरी चिंचवड व भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघ नंतर आता आगामी येणाऱ्या 2029 च्या विधानसभा निवडणुकीत आणखीन दोन विधानसभा मतदारसंघ निर्माण होणार असून पिंपरी चिंचवड शहरात एकूण पाच विधानसभा मतदारसंघ होणार असल्याचे अजित पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले.

भोसरी मध्ये राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता मेळावा मंगळवारी संपन्न झाला या मेळाव्यात अजित पवार बोलत होते.




महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संदर्भात सांगितले की, भोसरी व चिंचवड या विधानसभा मतदार संघात मतदारांची संख्या सध्या 13 लाख आहे व पिंपरी विधानसभा मतदारसंघात मतदारांची संख्या चार लाख झाली आहे अशी एकूण पिंपरी चिंचवड शहरात मतदारांची संख्या 17 लाख किंबहुना साडे सतरा लाख झाली आहे. आता जातनिहाय जनगणना करण्याचा एनडीए सरकारने निर्णय घेतला 2025 व 2026 या कालावधीत ही जनगणना होणार आहे.

व ही जनगणना झाल्यानंतर नक्कीच आगामी 2029 मध्ये मतदार संघाची फेररचना होणार आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात किमान चार मतदार संघ शंभर टक्के होणार आहे.

व कदाचित मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली व पाचवा मतदारसंघ झाला तर आश्चर्य वाटू देऊ नका असे अजित पवार यांनी सांगितले.

# किरकोळ वादातून एकावर चाकूने वार करून खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

किरकोळ वादातून एकावर चाकूने वार करून खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात मंगळवारी सायंकाळी घडली. खून करून पसार झालेल्या आरोपीविरुद्ध सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.राजू दादू आरू (वय ४२, रा. गोंदवले नाका, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे खून झालेल्याचे नाव आहे. या



प्रकरणी अनिल अशोक जाधव (वय ३८, सध्या रा. गायकवाड बिल्डिंग, नऱ्हे, मूळ रा. श्रीरामपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अनिल हा चालक म्हणून ना◌ोकरी करतो. राजू हा उपाहारगृहात कामाला होता. अनिल आणि राजू हे मित्र आहेत. मंगळवारी तो अनिलला भेटायला आला होता. सायंकाळी पाचच्या सुमारास त्यांच्यात वाद झाला. अनिलने राजूच्या डा◌ोक्यात लोखंडी बादली घातली. त्यानंतर त्याच्यावर चाकूने वार केले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. अनिल आणि राजू यांच्यात झालेल्या वादामागचे कारण समजू शकले नाही.

# क्रेनच्या धडकेत वारकऱ्याचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भरधाव वेगातील क्रेनने धडक दिल्यामुळे एका वारकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना देहू-आळंदी रोडवर तळवडे येथे बुधवारी दुपारी पावणे बारा वाजताच्या सुमारास घडली. नारायण गोदवे (वय ५७, रा. आहेरगाव, ता. माढा, जि. सोलापूर) असे अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्याचे नाव आहे.ते देहू वरून आळंदीला पायी चालले होते. ते तळवडे येथील शेलार वस्ती जवळ आले असता पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या क्रेनने त्यांना जोरदार धडक दिली.

या अपघातात ते गंभीर जखमी झाले.चिखली पोलिसांनी त्यांना त्वरित वायसीएम रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

त्यांच्याजवळ असलेल्या मोबाइल वरून पोलिसांनी त्यांच्या मुलाशी मुंबई येथे संपर्क साधला आहे. पोलिसांनी आरोपी क्रेन चालक याला ताब्यात घेतल्या असून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.




बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968